Add

९७

स्वातंत्र्य सैनिक व त्याचे नामनिर्देशित यांना शासन सेवेत नेमणुकांसाठी दिलेल्या सवलतीनुसार नेमणुका देण्याबाबत कार्यवाही तत्परतेने करण्यासंबंधात —

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक:-सीएनएस-१०९०/३४९७/सीआर-७४/९०/१६-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक:- २२ जानेवारी १९९१.

पहा:- १] शासन परिपत्रक ज्ञापन, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-सीएनएस-१०६५/४६५२/जे, दिनांक १२ ऑक्टोबर १९६५.
२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीएनएस-१०८१/१/१६-अ, दिनांक २ मार्च १९८१.
३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीएनएस-१०८४/सीआर-१०३/१६-अ, दिनांक १० जानेवारी १९८५.
४] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीएनएस-१०८२/३६११/सीआर-२८/८५/१६-अ, दिनांक २२ नोव्हेंबर १९८५.
५] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीएनएस-१०८७/०/सीआर-१४/१६-अ, दिनांक १३ मार्च १९८७.
६] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीएनएस-१०८७/२७४३/सीआर-४१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी १९८८.
७] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीएनएस-१०८७/३४६२/सीआर-५५/८८/१६-अ, दिनांक ३० नोव्हेंबर १९८८.
८] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीएनएस-१०८९/१११०/सीआर-३० /१६-अ, दिनांक २० सप्टेंबर, १९८९.
९] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-प्रानिर्म-२४८९/प्र.क्र.२२३/८९/१३-अ, दिनांक २० फेब्रुवारी १९९०.
१०] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-सीएनएस-१०९०/३४९७/सीआर-७४/१६-अ, दिनांक २२ जानेवारी १९९१.

शासन परिपत्रक:-

स्वातंत्र्य सैनिकांना शासन सेवेत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील वर्ग-३ व वर्ग-४ च्या पदावर नियुक्तीसाठी संदर्भाधीन आदेशानुसार शासनाने सवलती दिलेल्या आहेत. त्यानुसार स्वातंत्र्य सैनिकाने नोकरीसाठी केलेल्या अर्जाचा विचार करून ते संबंधित पदावर, नियुक्तीसाठी अन्यथा पात्र असल्यास त्यांना पसंतीक्रमाने नेमणूक देण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. या सवलती मुळात: स्वातंत्र्य सैनिकांसाठीच आहेत; परंतु वार्धक्यामुळे किंवा आजारपण इत्यादी कारणांमुळे स्वत: स्वातंत्र्य सैनिक नोकरीविषयक सवलत घेण्यास अपात्र

असल्यास त्यांच्यावर अवलंबित असलेल्या जवळच्या एका नातेवाईकास सवलतीचा फायदा देण्यासाठी ते नामनिर्देशित करु शकतात. अशा नामनिर्देशित केलेल्या एका नातेवाईकास स्वातंत्र्य सैनिकास वैयक्तिकरित्या असलेल्या सवलतीचा फायदा देता येतो.

२. ह्या संबंधात स्पष्ट आदेश असूनही शासनाच्या असे निदर्शनास आणण्यात आले आहे की, स्वातंत्र्य सैनिक/ त्यांचे नामनिर्देशित यांनी नोकरी मिळण्यासाठी केलेल्या अर्जानुसार त्यांना नोकरीसाठी प्राधान्यक्रम देण्याबाबत काही कार्यालयामधून विचार करण्यात येत नाही, त्यामुळे याबाबतीत स्वातंत्र्य सैनिकांना वारंवार शासनाकडे धाव घ्यावी लागते. अतएव स्वातंत्र्य सैनिकांच्या अर्जावर नियमानुसार तत्परतेने कार्यवाही व्हावी या दृष्टीने शासनाचे संबंधित आदेश आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील विविध विभाग व कार्यालये तसेच प्रशासकीय नियंत्रणाखालील संबंधित शासकीय उपक्रम, महामंडळे, औद्योगीक संस्था, महापालिका, जिल्हा परिषदा, इत्यादींच्या निदर्शनास आणावेत व त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने त्यांना योग्य त्या सूचना देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

मुख्य सचिव.

प्रति,
सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विभाग प्रमुख,
/कार्यालय प्रमुख,
सर्व जिल्हाधिकारी,
निवड नस्ती.